# लॉकर करारनामा

करारनामा लिहुन घेणार :-
राजारामबापु सहकारी बँक लि. पेठ. शाखा--------------- तर्फे शाखाधिकारी
नाव :- श्री/सौ

पत्ता:-

करार नामा लिहुन देणार :-
नाव :- श्री/सौ/मे.

पत्ता:-

आपल्या बँकेच्या सेफ डिपॉझीट व्हॉल्ट मधील लॉकर भाड्याने देण्याबाबत केलेला अर्ज आपण मान्य करुन आम्हास सेफ नं. मधील वर्गाचा लॉकर नं. किल्ली नं. वापरण्यास दिलेबद्द्ल आम्ही खालील अटी व शर्तीस अधिन राहुन भाडे करारनामा लिहुन देत आहोत.

**अटी व शर्ती**

1) सेफ डिपॉझिट व्हॉल्ट बँकेच्या कामकाजाच्या दिवशी कामकाज वेळेत चालु राहील.

2) लॉकरधारकास लॉकरमध्ये कागदपत्रे, दागिने, किवां मौल्यवान वस्तु ठेवण्याव्यतिरीक्त इतर कोणत्याही बेकायदेशीर अथवा स्फोटक वस्तु ठेवता येणार नाहीत. अशा बेकायदेशीर वस्तु ठेवलेचे बँकेच्या निदर्शनास आल्यास अथवा संशय आल्यास त्याबाबत लॉकरधारकावरती योग्य ती कारवाई करणेचा अधिकार बँकेस राहील. तसेच सदरचे लॉकर लॉकरधारक व त्याने नियुक्त केलेल्या व्यक्ती व्यतिरीक्त इतर कोणालाही वापरता येणार नाही.

3) लॉकरचे किमान 12 महिण्याचे भाडे अगाऊ स्वरूपात भरले पाहिजे. परंतु सदर कालावधीत मुदतीपुर्वी लॉकरधारकाने लॉकर सरेन्डर केल्यास जेवढे कालावधीसाठी लॉकर वापरले आहे, तेवढ्याच कालावधीचे लॉकर भाडे घेतले जाईल.देय भाडे वेळेत न भरलेस लॉकरमध्ये प्रवेश नाकारण्याचा अधिकार बँकेस राहील.

4) लॉकर भाडे तिन वर्षे थकीत असल्यास बँकेने लॉकरधारकास नोटीस दिल्यानंतर देखील मुदतीत भाडे भरले नसल्यास, बँक लॉकर परस्पर ब्रेक ओपन करेल. तसेच सदर लॉकर मधील वस्तुची यादी तयार करून सर्व वस्तु बँकेच्या ताब्यात ठेवणेत येतील. तसेच सदर सर्व/अंशता वस्तुचा लिलाव करून थकीत भाडे आणि लॉकर ब्रेक ओपन व दुरुस्तीचा खर्च वसुल करणेचा अधिकार राहील. याबाबत लॉकरधारकास कोणतेही तक्रार करता येणार नाही.

5) लॉकर, लॉक, किंवा चावीची सर्व दुरुस्ती केवळ बँकेद्वारे अधिकृत नियुक्त व्यक्तीमार्फत केली जाईल.

6) लॉकरधारकाने चावी हरवल्यास, विलंब न करता बँकेला सूचित केले पाहिजे. लॉकर किंवा चाव्या उघडण्याचे आणि बदलण्याचे सर्व शुल्क लॉकर धारकाकडुन वसुल केले जाईल.

7) लॉकर धारकास लॉकर रद्द करावयाचे असल्यास लेखी सुचना देवुन, बँकेच्या कामकाजाच्या वेळेत लॉकर किल्ली परत करून देय रक्कम भरले नंतर लॉकर रद्द करता येईल.

8) लॉकर धारकाने लॉकरच्या चाव्या सुरक्षीत टेवाव्यात त्याच्या लॉकरची माहीती व चाव्या इतर कोणालाही देवु नये.

9) महत्वाच्या किंवा तातडीच्या गरजेच्या कारणास्तव बँकेस लॉकर विभाग आवश्यक वाटेल अशा कालावधीसाठी बंद करण्याचा अधिकार राखून ठेवला आहे. बँकेने पुर्वसूचना न देता विभाग उघडण्याच्या आणि बंद करण्याच्या वेळेत बदल करण्याचा अधिकार राखून ठेवला आहे.

10) लॉकरधारकाच्या पत्त्यातील कोणताही बदल बँकेला ताबडतोब कळवण्यात यावा, अन्यथा बँकेने पोस्टाने पाठवलेली कोणतीही सूचना किंवा संप्रेषण आपणास मिळालेले आहे, असे गृहीत धरणेत येईल.

11) बँकेने लॉकर संदर्भातील केलेले वेळोवेळी नियमातील बदल आणि नियमाचे पालन करणे लॉकरधारकास बंधनकारक राहील.

12) लॉकरधारकाकडुन देय असणारे लॉकर भाडे साठी त्यांच्या सेफ डिपॉझीट लॉकरमधील मालमत्तेवरती जनरल लीनचा अधिकार बँकेस राहिल, व सदर मालमत्तेतील संपुर्ण किंवा अंशत: मालमत्ता विक्री करून लॉकरचे भाडे वसुल करणेचा अधिकार बँकेस राहिल.

13) लॉकरधारकाकडुन ठेव घेतली असलेस लॉकर सरेंडर केलेनंतर आणि सदर लॉकरची चावी परत केल्यानंतर लॉकर भाडे किंवा इतर कोणतेही चार्जेस देय नसलेस ठेवीची रक्कम परत केली जाईल.

14) लॉकरधारकास नोटीस दिल्यानंतर लॉकरचे भाडे मध्ये बदल करणेचा अधिकार बँकेकडे असेल, आणि ठरवल्याप्रमाणे बदलेले भाडे लॉकरधारकाने भरणे बंधनकारक असेल.

15) लॉकर सात वर्षांच्या कालावधीसाठी इनऑपरेटिव्ह असल्यास आणि लॉकरधारकाचा शोध घेता येत नसलेस तसेच जरी भाडे नियमितपणे दिले जात असले तरीही, बँक लॉकरमधील वस्तु त्यांच्या नॉमिनी/कायदेशीर वारसांना हस्तांतरित करण्यास किंवा वस्तूंची पारदर्शक पद्धतीने विल्हेवाट लावण्याचा अधिकार बँकेस राहील. याबाबत कोणतेही कायदेशिर जबाबदारी बँकेवर राहणार नाही.

16) लॉकरमध्ये ग्राहकाने ठेवलेल्या अथवा घेवुन गेलेल्या वस्तुचे रेकॉर्ड बँक ठेवत नाही, म्हणुन ग्राहकाने ठेवलेल्या वस्तुचे विमा उतरवण्याची जबाबदारी बँकेची राहणार नाही.

17) लॉकर उघडण्याचा अधिकार आमच्यातर्फे ज्या कोणास दिला असेल त्याचे नांव, पत्ता व सहीचा नमुना आपणांस देऊ. नेमलेला मुखत्यार काढुन अगर बदलुन टाकावयाचा असल्यास तसे बँकेस लेखी कळवु. तत्पुर्वी बँकेच्या दप्तरी दाखल नांव असलेल्या मुखत्याराच्या सर्व व्यवहारास आम्ही जबाबदार राहु. याबाबत कोणत्याही प्रकारची जबाबदारी बँकेवर राहणार नाही.

18) सेफ डिपॉझीट व्हॉल्टमधील लॉकर्स भाड्याने देण्याबाबतचे आपले सर्व नियम आम्ही वाचले असुन ते आम्हास सर्वस्वी मान्य आहेत. यापुढे सदर नियमात बँक वेळोवेळी जो बदल करील तो सर्व आमच्यावर बंधनकारक राहील.

हा करारनामा आम्ही राजीखुशीने व अक्कलहुशारीने लिहुन देत आहे.

सदर लॉकरसाठी वारस म्हणुन आम्ही

श्री------------------------------------------------------ पत्ता

नाते------------------------------------------------ याची नेमंणुक करीत आहे.

| करारनामा लिहुन देणार | करारनामा लिहुन घेणार |
|---|---|
| 1------------------------------------ | राजारामबापु सहाकारी बँक लि पेठ |
| 2 ---------------------------------- | शाखा---------------------------तर्फे |
| 3------------------------------------- | शाखाधिकारी |
| | श्री-------------------------------- |

ठिकाण----------------------

दिनांक----------------------